# (४) : आंध्र - प्रदेश :

## अतिशयक्षेत्र  - कुलपाक

मार्ग: हैद्राबाद- काझीपेठ रेल्वे मार्गावर आलेर रेल्वेस्टेशनपासून ६ कि.मी. दूर क्षेत्र आहे. या ठिकाणी भ. आदिनाथ तीर्थंकरांची सातिशय प्रतिमा माणिक स्वामी नावाने प्रसिध्द होती. परंतु दुर्भाग्याने ती चोरीला गेल्याने दुसरी हिरव्या पाषाणाची प्रतिमा विराजमान केलीली आहे.

## वारंगल

मार्ग: हैद्राबादपासून १५२कि.मी. अंतरावर आहे. वारंगलपासून ८कि.मी अंतरावर एक विशाल किल्ला आहे. एकेकाळी या ठिकाणी जैन समाजाची मोठी वस्ती होती. आता किल्ल्यात ४ जिनमंदिर व अनेक कलापूर्ण वास्तु आहेत.

## हैद्राबाद

मार्ग: सोलापूरहून ३०० कि.मी सडकमार्गे व रेल्वे मार्गे सुध्दा हैद्राबादला जाता येते. हैद्राबाद हे आंध्र प्रदेशाची असून या ठिकाणी केशरबाग विभागात दिंगबर जैन चंद्रप्रभू मंदिर व मानस्तंभ आहे.

प्रेक्षणीय स्थळे: (१) चार मिनार (२) गोवळकोंडा किल्ला (३) सालारजंग संग्रहालय  (४) प्राणी संग्रहालय (५) बिर्ला मंदिर आदि दर्शनीय स्थळे आहेत.

सुविधा:  महाराजागंज येथे जैन भवन आणि हनुमान टेकडी किंग कोठी येथे जैन धर्मशाळा उपलब्ध आहेत.